**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 19.12.2025** **वार-शुक्रवार**

---

**मेधा कुलकर्णी**

संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज आह अनिश्चित काळासाठी संस्थगित करण्यात आलं. या अधिवेशनात राज्यसभा खासदार डॉ. मेधा कुलकर्णी यांनी काल मानव आणि वन्यजीव यांच्यातील संघर्षाचा मुद्दा आक्रमकपणे मांडला. महाराष्ट्रात मानव आणि वन्यजीव यांच्यातील संघर्षाने आता अत्यंत गंभीर वळण घेतले असून, वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या शेतीच्या नुकसानीचा आकडा वर्षाकाठी 10 हजार कोटी रुपयांच्या पुढे गेला आहे. वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या जीवितहानीचेही प्रमाण वाढले असून, हा संघर्ष टाळण्यासाठी सरकारने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी मेधा कुलकर्णी यांनी काल राज्यसभेत केली.

**राष्ट्रीय बौद्धिक संपदा**

देशाच्या अर्थव्यवस्थेला अधिक मजबूत करण्यासाठी राष्ट्रीय बौद्धिक संपदेचे संवर्धन करणे गरजेचे असून, सर्व लहान-मोठ्या उद्योजकांनी आयपी, पेटंट यांची नोंद करावी असं आवाहन केंद्रीय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाचे सहायक संचालक अभय दफ्तरदार यांनी आज पुण्यात केलं. मंत्रालयाच्या सहकार्याने आणि एआयसी-पिनॅकल आंत्रप्रेन्युअरशीप फोरमच्या वतीने आयोजित राष्ट्रीय बौद्धिक संपदा यात्रेचं उद्घाटन अभय दफ्तरदार यांच्या हस्ते आज झालं' त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला एमएसएमई उद्योजक, स्टार्टअप्स, तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यावसायिक, कायदेविषयक तज्ज्ञ, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## राष्ट्रीय कला उत्सव

केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयाचा महत्त्वपूर्ण उपक्रम असलेला 'राष्ट्रीय कला उत्सव 2025' यावर्षी पुण्यात आयोजित करण्यात आला आहे. उद्यापासून 23 डिसेंबरपर्यंत यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी म्हणजेच यशदा इथं हा उत्सव होणार आहे. शिक्षण अधिक सर्जनशील आणि आनंददायी बनवण्याचा उद्देशानं भरवण्यात येत असलेल्या या उत्सवात देशातील सर्व राज्ये, केंद्रशासित प्रदेशांसह केंद्रीय विद्यालये, नवोदय विद्यालये आणि एकलव्य मॉडेल निवासी शाळांमधील विद्यार्थी आणि शिक्षक सहभागी होणार आहेत. गायन, वादन, नृत्य, नाटक, दृश्यकला, पारंपरिक कथाकथन अशा 12 विविध कला प्रकारांचं सादरीकरण यामध्ये होणार आहे.

## निवडणूक

पुणे जिल्ह्यातील बारामती, दौंड, फुरसुंगी-उरुळी देवाची, लोणावळा आणि तळेगाव दाभाडे या नगरपरिषदांच्या निवडणुकीसाठी उद्या मतदान होणार आहे. यासाठी संबंधित मतदार संघांमध्ये उद्या सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली असल्याची माहिती जिल्हाधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली आहे. या निवडणुकीसाठी मतदारांनी न चुकता मतदान करावं असं आवाहन डुडी यांनी केलं आहे.

## मनपा निवडणूक

पुणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या 600 पेक्षा जास्त इच्छुकांनी अर्ज सादर केले आहेत. पक्षाकडे उमेदवारी अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिवशी कार्यालयात सकाळपासून मोठ्या प्रमाणात गर्दी होती. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडील 252 इच्छुकांनी काल मुलाखती दिल्या.

दरम्यान आगामी महानगरपालिका निवडणुकीत सनय छत्रपती शासन पक्ष राज्यातील सर्व 29 महानगरपालिका स्वबळावर लढविणार आहे, असं पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नामदेवराव जाधव यांनी पुण्यात पत्रकार परिषदेत सांगितलं. 'शहर करू सिंगापूर' हे आमचं ध्येय असून, पुण्यातही सर्व 165 जागांवर उमेदवार दिले जातील, असं ते म्हणाले.

**'आप'ची उमेदवार यादी**

आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आम आदमी पार्टीने पुणे शहरासाठी उमेदवारांची पहिली यादी काल जाहीर केली. पुण्यात ‘आप’ स्वतंत्रपणे निवडणूक लढवणार आहे. सांस्कृतिक आणि शैक्षणिक ओळख असलेलं पुणे शहर गुन्हेगारी आणि अपघातांचं शहर म्हणून ओळखलं जाऊ लागलं आहे; या पार्श्वभूमीवर आम आदमी पार्टीच्या माध्यमातून पर्याय देण्याचा आमचा प्रयत्न आहे, असं 'आप'चे राज्य प्रवक्ते मुकुंद किर्दत यांनी यावेळी सांगितलं.

**सिकलसेल तपासणी**

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने राज्यात 15 जानेवारी ते 31 जानेवारी 2026 या कालावधीत 'सिकलसेल तपासणी विशेष पंधरवडा' राबविण्यात येणार आहे. या कालावधीत सिकलसेल आजाराचे निदान, उपचार संदर्भ सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. सिकलसेल आजाराचे प्रमाण अधिक असलेल्या राज्यातील 21 जिल्ह्यांतील प्रत्येक नागरिकाची सिकलसेल तपासणी करण्यात येणार आहे.

**भीमाशंकर**

नाशिकमध्ये 2027 मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर पुण्यातील श्री क्षेत्र भीमाशंकर येथे भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी अपेक्षित आहे. ही संभाव्य गर्दी लक्षात घेऊन विकासकामे गुणवत्तापूर्ण, टिकाऊ आणि वेळेत पूर्ण

करण्याचे नियोजन करण्याचे निर्देश पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले आहेत. या संदर्भात झालेल्या बैठकीत ते बोलत होते.

**आयएसओ**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या श्रीमती लीलाबाई कांतीलाल खिवंसरा प्राथमिक शाळेला आयएसओ गुणवत्ता प्रमाणपत्र मिळाले आहे. राज्य शासनाने निश्चित केलेल्या 24 निकषांची यशस्वी पूर्तता केल्याबद्दल हे प्रमाणपत्र देण्यात आलं आहे. शाळेतील बोलक्या भिंती, गांडूळ खत प्रकल्प, विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा, याबरोबरच गेल्या तीन वर्षांतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, उपस्थिती, पटसंख्या, शाळेचं व्यवस्थापन आदींचं सखोल मूल्यमापन केल्यानंतर या शाळेला आयएसओ गुणवत्ता प्रमाणपत्र मिळालं आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज किमान तापमान 8 अंशांपर्यंत खाली उतरलं होतं. आज 8 पूर्णांक 3 दशांश अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली. उद्याही पारा 8 अंशाच्या आसपास राहण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता. ताज्या पुणे वृत्तांतसह नमस्कार.**